# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १४४–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. दिनकर रघुनाथ लोणकर,<br>मु. मुरुम, पो. खामगाव, ता. फलटण, जि. सातारा<br>द्वारा : मु. पाडेगांव, ता. फलटण, जि. सातारा | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सातारा<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, फलटण, जि. सातारा<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>ग्रामीण उप विभागीय कार्यालय, फलटण, जि. सातारा | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. दिनकर रघुनाथ लोणकर, मु. मुरुम, पो. खामगाव, ता. फलटण, जि. सातारा यांचे नावावर घरगुती विद्युत कनेक्शन आहे. सदर कनेक्शनवरुन वीज चोरी होत असल्याचे आढळून आल्यामुळे दि. ८.५.२००७ रोजी महावितरणचे शाखाधिकारी, साखरवाडी –१ व सहाय्यक अभियंता, फलटण ग्रामीण उप विभाग यांनी वीज चोरी प्रकरणी कारवाई केली. त्यानुसार ग्राहकाकडून वीज चोरी प्रकरणी दंडाची रक्कम रु.४०,२४०/– दोन हप्त्यांत रु. ३०,०००/– दि. १६.५२००७ व रु. १०,२४०/– दि. ८.१.२००८ रोजी भरुन घेतली.

दि.१४.१.२००८ रोजी तक्रारदाराला कोणतीही पूर्व सूचना वा नोटीस न देता विद्युत पुरवठा कायमस्वरुपी खंडीत केला व तो जोडून मिळावा म्हणून तक्रारदाराने दि. १९.१.२०१० रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सातारा येथे तक्रार दाखल केली. त्याची सुनावणी दि. २६.२.२०१० रोजी घेण्यात आली असून दि.१९.३.२०१० रोजी कक्षाने आदेश पारीत केला. सदर आदेशाने समाधान न झाल्यामुळे तक्रारदाराने दि.१०.६.२०१० रोजी ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर यांचेकडे तक्रार दाखल केली.

दि. २९.६.२०१० रोजी सदर तक्रारीची ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर येथे सुनावणी घेण्यात आली. तक्रारदार श्री. लोणकर, तक्रारदार प्रतिनिधी श्री. काटकर हजर. वि.प.तर्फे श्री. प्रभू, कार्यकारी अभियंता, सातारा मंडल, श्री. कुमठेकर, कार्यकारी अभियंता, फलटण, श्री. चितळे, सहाय्यक अभियंता, फलटण ग्रामीण उप विभाग हे हजर होते.

तक्रारदाराची मागणी

तक्रारदार प्रतिनिधी यांनी बाजू मांडतांना असे सांगितले की, वीज कनेक्शन जरी तक्रारदाराचे नावावर असले तरी वीज चोरी ही त्यांच्या मुलाने केली असून वीज चोरी प्रकरणी रक्कम मुलाने भरली असून त्यात वडिलांचा संबंध नाही. मी नोकरी निमित्त परगांवी असतो. वीज चोरी प्रकरणी पैंसे भरुनसुध्दा दि. १४.१.२००८ पासून कनेक्शन नोटीस न देता बंद करण्यात आले ते पूर्ववत जोडून द्यावे व १ लाख रुपये नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी केली. तसेच सातारा कक्षाने तक्रारदार प्रतिनिधी यांना बाजू मांडण्यास परवानगी दिली नसल्याचे सांगितले.

महावितरणतर्फे खुलासा

दि. ८.५.२००७ रोजी तक्रारदार यांचे घरी वीज चोरी आढळल्यामुळे वीज चोरी प्रकरणी कारवाई करण्यात आली व सदर कनेक्शन ( आर– १०१) तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आले. तक्रारदार यांनी सदर वीज चोरी प्रकरणी देय रक्कम रु. ४०,२४०/– एक रकमी न भरता दोन हप्त्यांत रु. ३०,०००/– दि. १६.५.२००७ व रु. १०,२४०/– दि.८.१.२००८ रोजी भरली.

सदर कनेक्शन तात्पुरत्या स्वरुपात बंद केले असतांना परस्पर जोडून वीज वापर होत असल्याचे संबंधित जनमित्र श्री. निवृत्ती पांडुरंग टिळेकर यांचेकडून समजलेवरुन दि. १५.१.२००८ रोजी शाखाधिकारी व लाईन स्टाफ हे कनेक्शन बंद करणेस गेले असता तक्रारदाराचा मुलगा श्री. विजय दिनकर लोणकर यांनी मज्जाव केला. त्यामुळे त्यांचेविरुध्द सरकारी कामात अडथळा आणल्या प्रकरणी दि. १८.१.२००८ रोजी पोलीस स्टेशन साखरवाडी येथे गुन्हा (गुन्हा क्र. २९/२००८) नोंद झालेला असून न्यायप्रविष्ट आहे. पोलिसांच्या मदतीने मीटर काढण्यात आलेला असून सध्या मीटर पोलिसांच्या ताब्यात आहे. वीज चोरी प्रकरणी पैंसे भरल्यानंतर रिकनेक्शन फी तक्रारदाराने भरलेली नाही व परस्पर जोडून घेतल्याने बंद करणेत आले. तशी नोंद श्री. प्रदीप माणिकराव पवार, कनिष्ठ अभियंता, साखरवाडी यांनी दि. १८.१२००८ रोजी दिलेल्या खबरी जबाबात केलेली आहे. एवढे सर्व घडूनसुध्दा सदर ठिकाणी दि. १.१०.२००९ रोजी पुन्हा चोरी आढळली असून दि. २.१०.२००९ रोजी पुणे येथील महावितरण पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करणेत आला आहे. तक्रारदार हे महावितरणचे कर्मचारी असल्यामुळे त्यांचेवर शिस्तभंगाची कारवाई केली आहे.

वरील दोन्ही बाजूंचे म्हणणे लक्षांत घेता, श्री. दिनकर रघुनाथ लोणकर यांनी कनेक्शन परस्पर जोडून विद्युत कायदा २००३ च्या कलम १३८ चा भंग केल्याचे दिसून येते. तसेच कलम १३५ चा भंग केलेला आहे असे दोनदा निदर्शनास आले. त्यामुळे खालील आदेश देत आहोत.

## आदेश

१) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६, कलम ६.८ (ब) नुसार सदर तक्रार अर्ज अधिनियम कलम १३५ ते १३९ मध्ये तरतूद केलेले अपराध व दंड या संबंधी असलेमुळे ती गाऱ्हाणी मंचाच्या अधिकार क्षेत्रात येत नसलेने सदर तक्रार अर्ज फेटाळण्यात येत आहे. त्यामुळे नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न नाही.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( जी. बी. पानकर )
सदस्य सचिव

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष